आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

# School Leadership Academy

# Maharashtra

## मोड्यूल क्र.१५

## रत्नागिरी जिल्ह्यातील प्रज्ञावान/ प्रज्ञावंत मुलांसाठीच्या शालेय स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

## Role of School Leadership for Success in School Competitive Examinations for Intelligent Children in Ratnagiri District

'प्रत्येक विदयार्थ्यामध्ये जन्मजात बुद्धिमत्ता असते. त्यांचा शोध घेऊन, पोषक वातावरण तयार करून ती विकसित केली गेली पाहिजे. ही बुद्धिमत्ता विविध रुची, स्वभाव आणि क्षमता या स्वरूपात व्यक्त होऊ शकते. जे विद्यार्थी ज्या एखाद्या विशिष्ट क्षेत्रात आत्यंतिक रुची व क्षमता दाखवितात त्यांना सामान्य शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडे या क्षेत्रात पाठपुरावा करण्यासाठी प्रोत्साहित केले गेले पाहिजे. शिक्षक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची अशी बुद्धिमत्ता आणि रुची ओळखून त्यांचे पालनपोषण करण्याच्या पद्धतींचा समावेश असेल.'- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

प्रज्ञावंत बालके ही राष्ट्राची संपत्ती असते. देशाच्या विकासामध्ये त्यांचे योगदान बहुमोल ठरू शकते. नवीन भारताची उभारणी करण्यासाठी सर्जनशील व कुशाग्र बुद्धीला पोषक असे शिक्षण हवे आहे. एवढ्या मनुष्यबळाची आवश्यकता असताना ही प्रतिभा व प्रज्ञा शोध न घेता वाया जाऊ देणे, हा अक्षम्य अपराधच असेल. बुद्धिमापन चाचणीच्या आधारे व्यक्तींच्या बुद्धिगुणांकाचे मापन करून तिच्या आधारे संबंधित व्यक्ती सामान्य आहे, असामान्य आहे की अपसामान्य आहे या अनुषंगाने वर्गीकरणाचा आलेख काढला असता तो घंटाकृती दिसतो. सर्वसाधारणपणे जनसामान्यातील सुमारे ७०% व्यक्ती सामान्य बुद्धीच्या असून, १५% व्यक्ती अपसामान्य व १५% व्यक्ती या असामान्य बुद्धिमत्तेच्या असतात. मंदमती प्रमाणे अतिशीघ्र बुद्धीच्या व्यक्तींचे प्रमाण धनात्मक टोकाकडे कमी कमी होत जाते व बुद्धीची कुशाग्रता वाढत जाते. व्यक्तीच्या बुद्धिगुणांकावरूनच व्यक्ती शीघ्र बुद्धीची किंवा असामान्य किंवा कुशाग्र बुद्धीची आहे हे ठरविले जाते. साधारणतः सामान्यपेक्षा जास्त म्हणजेच ११० ते १३० बुद्धिगुणांक असलेल्या व्यक्ती शीघ्र बुद्धी, १३० ते १४० पर्यंत बुद्धिगुणांक असलेल्या व्यक्ती तीव्र बुद्धी तर १४० पेक्षा अधिक बुद्धिगुणांक असलेल्या व्यक्ती कुशाग्र, असामान्य किंवा बुद्धीचे वरदान मिळालेल्या व्यक्ती असे संबोधले जाते. भारतात १९६३ साली राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, न्यू दिल्ली (एनसीईआरटी) या संस्थेने राष्ट्रीय विज्ञान प्रज्ञाशोध योजना सुरू केली. १९७७ मध्ये तिचे राष्ट्रीय प्रज्ञाशोध योजनेत रूपांतर झाले. या योजनेअंतर्गत प्रज्ञावंत मुला-मुलींचा शोध घेऊन त्यांना पुढील आयुष्यात त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडून आवडीच्या संस्थेत शिक्षण घेता यावे, यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

बाल्यावस्थेतील विकासाच्या प्रगतीवरून मूल साधारणतः सामान्य आहे की नाही हे लक्षात येते. मुलाच्या विकासाचे टप्पे जास्त गतिमान असतील तर ते मूल उभे राहणे, चालणे, बोलणे, भाषा आत्मसात करणे, स्मृती जास्त तीव्र असणे इत्यादी बाबतीत असामान्य आहे हे लक्षात येते. अशा मुलांच्या संगोपन काळात पालकांनी विशेष जागरूक राहून त्यांची जिज्ञासा मारली जाणार नाही याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. शाळेमध्ये सुद्धा त्याची कल्पकता, जिज्ञासा इत्यादी गोष्टींना उत्तेजन देऊन त्या वाढीस लावल्या पाहिजेत. त्याच्या ठिकाणी कोणती क्षमता आहे याचा शोध घेऊन त्याच्या विशेष क्षमतेच्या विकासाला वाव दिला पाहिजे.

रत्नागिरी जिल्ह्याची शैक्षणिक सद्य:स्थिती पाहिल्यास गुणवत्तेच्या दृष्टीने दहावी - बारावी बोर्ड परीक्षा, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS),राज्य संपादणूक सर्वेक्षण(SLAS) किंवा असर (ASER) यासारख्या अहवालामध्ये संपूर्ण राज्यात हा जिल्हा सतत वरचे स्थान मिळवित असल्याचे दिसून येते.पण दुसरीकडे शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेत व यशस्वितेचे प्रमाण कमी दिसते. भविष्यामध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये प्रावीण्य मिळवून वर्ग-१ व वर्ग-२ अधिकारी होण्याचे प्रमाण देखील या जिल्ह्यांमध्ये अत्यल्प असल्याचे दिसून येते. शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये शहरी व ग्रामीण भागामध्ये सुद्धा वेगवेगळे चित्र आपल्याला दिसून येते.या अनुषंगाने प्रज्ञावान मुलांसाठीच्या शालेय स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी शालेय नेतृत्वाला एक दिशा मिळावी आणि आपले कार्य करताना येणाऱ्या समस्यांवर समर्थपणे मात करता यावी यासाठी प्रस्तुत मोड्यूल विकसित केले आहे.

- **<u>मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :</u>**

१.प्रज्ञावंत बालके ही संकल्पना समजून घेणे.

२.शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेचे क्षेत्र समजून घेणे.

३.शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा क्षेत्रात यश प्राप्त केलेल्या मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाचे गुणविशेष समजून घेणे.

४.शालेय स्पर्धा परीक्षा क्षेत्रात काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

- **<u>प्रज्ञावान बालक /प्रज्ञावंत बालक क्षेत्र संकल्पना :</u>**

**प्रज्ञावंत बालके : व्याख्या व स्वरूप**

प्रतिभावंतासंबंधीच्या अभ्यासाचे निष्कर्ष १८७४ मध्ये सर फ्रान्सिस गाल्टन (उत्क्रांतिवाद मांडणाऱ्या चार्ल्स डार्विनचा भाऊ) यांनी प्रथम मांडले. त्यानंतर प्रतिभावंतासंबंधी अनेक अभ्यास झाले.

- **व्याख्या:**

**१. टर्मन,१९२६** यांच्या मते, प्रतिभा म्हणजे अतिशय उच्च प्रतीची बुद्धिमत्ता.

**२. बिट्टी (१९५८)** यांच्या मते, सातत्याने नेत्रदीपक कामगिरी करणारी व्यक्ती

**३. फ्लिगर व बिश (१९५९)** यांच्या मते विज्ञान, गणित, कला, सर्जनशील लेखन, संगीत, सामाजिक नेतृत्व अशा विशेष क्षेत्रांतील उच्च प्रतीची प्रज्ञा, तसेच सभोवतालची परिस्थिती हाताळण्यासाठी लागणारी उच्च प्रतीची सर्जनशीलता असलेली बालके म्हणजे प्रज्ञावंत बालके होत.

**४. रेन्झुली (१९७८)** यांच्या व्याख्येनुसार बौद्धिक पात्रता, हातातील कार्याविषयी श्रेष्ठ प्रतीची निष्ठा आणि उच्च सर्जनशीलता या तीन घटकांतील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे प्रतिभा होय. ज्या बालकांमध्ये ही सर्व गुणवैशिष्ट्ये आहेत किंवा जी मुले या गुणांचा विकास साधू शकतील व समाजोपयोगी क्षेत्रात त्यांचा वापर करू शकतील अशी बालके म्हणजे प्रज्ञावंत बालके.


**५. फिराने व कर्बी (१९८६)** यांच्या व्याख्येनुसार समाजाच्या दृष्टीने मूल्यवान अशा कोणत्याही क्षेत्रात श्रेष्ठ प्रतीची पात्रता धारण करणा-या कोणत्याही वयोगटातील व्यक्तींना प्रज्ञावंत म्हणता येईल.

**६. हॉवर्ड गार्डनर (१९८३) यांनी** बहुविध बुद्धिमत्तेची उपपत्ती मांडली आहे. बुद्धिमत्ता ही केवळ दोन किंवा चार घटकांनी मिळून बनत नसून मानवी बुद्धिमत्तेचे विविध घटक असतात, असे मत त्यांनी मांडले.

**हॉवर्ड गार्डनरची बहुविध बुध्दिमत्ता संकल्पना व अर्थ (Multiple Intelligence Concept and Meaning)**

“Multiple intelligences are different way of demonstrating intellectual ability” ‘बहुविध बुद्धिमत्ता- बौद्धिक क्षमता प्रमाणित करण्याचे विशेष मार्ग म्हणजे बहुविध बुद्धिमत्ता.’

“एक किंवा अनेक संस्कृतीत मोलाची ठरणारी लोकप्रिय निर्मिती करण्याची व समस्या सोडविण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता.” त्यांनी मूलभूत आठ घटक व नंतरच्या कालावधीत तीन असे एकूण अकरा घटक मांडले आहेत. दीर्घकाळ केलेल्या बुद्धिमत्तेविषयीच्या संशोधनावरून त्यानी बुद्धिमत्तेला जीवशास्त्रीय व सांस्कृतिक पाया असतो यावर भर दिला.




**बहुविध बुद्धिमत्तेचा पाया**


यावरून बुद्धिमत्ता अनुवंशिक असते, ही बाब त्यांनी नाकारली. अनेक सैद्धांतिक विश्लेषण शास्त्रीय पुरावे, संशोधन यांवरुन त्यांनी बुद्धिमत्ता ही उपजत नैसर्गिक असून, ती एक नाही तर अनेक प्रकारची असते. प्रत्येक व्यक्तीला उपजत सर्व बुद्धिमत्तेची ठरावीक केंद्रे त्यांच्या मेंदूमध्ये प्राप्त झाली आहेत. या बुद्धिमत्तेच्या कमी - अधिक प्रमाणानुसार व्यक्तीभेद दिसून येतो.

- **बहुविध बुद्धिमत्तेचे प्रकार :** गार्डनर यांनी बहुविध बुद्धिमत्तेचे पुढील प्रकार सांगितले





- <u>**प्रज्ञावंत व्यक्तींचे प्रकार व वैशिष्टये**</u> **:**

१८६९ मध्ये सर फ्रान्सिस गाल्टन यांनी जीनियस ( कुशाग्र बुद्धिमत्तेच्या ) म्हणण्यायोग्य अशा व्यक्तींचा अभ्यास सुरू केला, हे आपण पाहिले . त्यांनी वैज्ञानिक जगतातील सर्वश्रेष्ठ व्यक्तींच्या चरित्रांच्या अभ्यासावरून त्यांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे नमूद केली आहेत.




**फ्रान्सिस गाल्टन यांनी सांगितलेली प्रज्ञावंत व्यक्तींची वैशिष्टये**

जान फेल्डहुसेन (१९८२) यांनी कला, विज्ञान, राजकारण आणि शिक्षण या क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तीच्या जीवनाचा अभ्यास केला. त्यांच्या बालपणात दिसून आलेली विशिष्ट प्रज्ञा, अभियोग्यता, पात्रता यांचा अभ्यास करून त्यांनी अशा प्रतिभाशाली व्यक्तींच्या खुणा सांगितल्या.




**जान फेल्डहुसेन यांनी सांगितलेली प्रज्ञावंत व्यक्तींचे वैशिष्टये**

- **<u>प्रज्ञावंत बालकांचा शोध :</u>**

सर्वसाधारणपणे ५०% प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनाच शिक्षक बरोबर ओळखतात. याचाच अर्थ उरलेली ५०% प्रज्ञावंत बालके त्यांच्या नजरेतून सुटतात, तसेच शिक्षकांनी प्रज्ञावंत म्हणून सुचविलेल्या बालकांपैकी ४३ ते ९६ % मुले सामान्य असतात. साधारणपणे जी मुले दिसण्यात, वागण्यात चुणचुणीत असतात, शिक्षकाचे ऐकतात, अशी मुले प्रज्ञावंत आहेत असे बऱ्याच शिक्षकांना वाटते. योग्य शिक्षणाने या चुका सुधारता येतात.

शिक्षकांपेक्षा पालकच बालकांमधील प्रतिभा अधिक अचूकतेने ओळखतात. मार्टीन्सन यांनी सुचविले आहे की, प्राथमिक शाळेच्या सुरुवातीलाच सर्व पालकांना एक पत्रक, प्रश्नावली किंवा मापनश्रणी पाठवावी, आपल्या पाल्याविषयी माहिती देण्यास सांगावे. त्यात बालकाचे छंद, आवडीचे विषय, समस्या, गरजा, वेगळेपणा,

कलाविष्कार, आवडती पुस्तके हे व अशांसारखे मुद्दे असावेत. पालक व शिक्षकांकडून मिळविलेल्या माहितीबरोबरच अर्थात बालकाचे बुद्धिमापनही महत्वाचे. बुद्धिमापनाच्या गट- चाचणीचा तसेच तज्ज्ञांच्या साहाय्याने दिलेल्या वैयक्तिक चाचण्यांचा अहवाल बालक बौद्धिक दृष्टया किंवा अभ्यासक्षेत्रात प्रज्ञावंत आहे का हे ठरविण्यास उपयुक्त ठरतो. बुद्धिमापनासाठी स्टॅनफर्ड बिने चाचणी किंवा वेशलर बुद्धिमापन श्रेणी ( डब्ल्यू एस्सी ) वापरली जाते. भारतातही अनेक बुद्धिमापन कसोट्या आज उपलब्ध आहेत. सर्वसाधारणपणे १३० च्या वर बुद्धयांक असलेल्या मुलांना प्रज्ञावान म्हणतात.

- **<u>प्रज्ञावान बालकांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम :</u>**

प्रज्ञावंत बालकांसाठी आखल्या जाणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांचे स्वरुप पाहता त्यांची खालीलप्रमाणे तीन विभागात विभागणी केली जाते.

➢ **<u>खास कार्यक्रम:</u>**

खास कार्यक्रमासाठी अनेक पद्धतींचा वापर किरानो व कर्बी ( १९८६ ) यांनी सुचविला आहे.

<u>१. स्वतंत्र अभ्यास :</u> ग्रंथालयाचा वापर , शास्त्रीय पद्धती व इतर अन्वेषण, तंत्राची माहिती असल्यास स्वतंत्र अभ्यास आखणे सोपे जाते.

<u>२. जलद अध्ययन करून त्याचे मूल्यमापन :</u> या पद्धतीमुळे विद्यार्थी आपला अभ्यास जलद संपवून दुसऱ्या आवडीच्या विषयाचा अभ्यास करायला मोकळे होतात, ज्यामुळे अभ्यास करण्यातील कंटाळा पळतो.

<u>३. उच्च प्रतीच्या विचारप्रक्रियांचा उपयोग :</u> शिक्षकांनी वर्गातच सामान्य मुलांना विचारावयाच्या प्रश्नापेक्षा प्रज्ञावान मुलांना वरच्या पातळीवरचे प्रश्न विचारावेत केवळ ज्ञान, आकलन पातळीवरचे प्रश्न न विचारता या मुलांना विश्लेषण, मूल्यविवेक, तर्काधिष्ठित प्रश्न विचारावेत. त्यामुळे त्यांच्या विचारशक्तीला खाद्य मिळते.

<u>४. तज्ञ व्याख्यात्यांना आमंत्रित करणे :</u> तज्ज्ञ मंडळी सर्वसामान्य शिक्षकाच्या आवाक्याबाहेरची कितीतरी नवीन माहिती देतात.

५. विशेष प्रतीचे अध्ययन साहित्य वापरावयास देणे.

६. माध्यमिक शाळेत अभ्यासविषयांबरोबरच पुढील आयुष्यात निवडावयाच्या व्यवसायासंबंधी माहिती करून द्यावी.

७. आंतरराष्ट्रीय बक्कालारेटच्या पदवीसाठी तसेच जागतिक महाविद्यालय (युनायटेड वर्ल्ड कॉलेज) अभ्यास करण्याची संधी मिळावी या दृष्टीने तयारी करून घेणे, आंतरराष्ट्रीय बक्कालॉरेटचे कार्यालय जिनेवा येथे असून, यू.डब्ल्यू.सी. मेक्सिकोमध्ये आहे. दोन्ही ठिकाणी प्रज्ञावान विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. आपल्याकडे ज्ञानप्रबोधिनी, पुणे ही अभ्यासातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी शाळा आहे. याशिवाय आज निरनिराळया संगीत, कला, नाटय संस्था स्थापन झालेल्या आहेत व अशा संस्था संगीतात, चित्रकलेत, नाट्यकलेत, खास प्रतिभा दाखविणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन शिक्षण देतात.

➢ **<u>वयापेक्षा वरच्या वर्गात घालणे ( एक्सलेरेशन ) :</u>**

<u>१.लवकर प्रवेश घेणे :</u> ठरविलेल्या वयापेक्षा कमी वयातच मुलांना शाळेत, बालवाडीत प्रवेश देणे.

<u>२. एक इयत्ता सोडून पुढच्या वर्गात जाणे :</u> म्हणजे एकदम दुसरीत किंवा तिसरीत बसणे (पहिलीत किंवा दुसरीत न बसता)

३. काही वेळा पहिली दुसरीत गेल्यानंतर प्रज्ञावान बालकाचा शोध लागतो. त्या वेळी त्याला वेगळी सोय उपलब्ध करून देता येते . दोन इयत्तांचा अभ्यास एकाच वर्षी करून परीक्षा देणे, म्हणजे उदा. पाचवी व सहावीचा अभ्यास एकाच सत्रात करून दोन्ही सत्रांच्या शेवटी सहावीच्या परीक्षेला बसणे. अशा प्रकारच्या अभ्यासात क्रमन्वित अध्ययनाचा (प्रोग्राम लनिंग) तसेच संगणकाद्वारा अध्ययनाचा उपयोग करून घेता येतो.

४. प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी सुटीच्या दिवशी वेगळे वर्ग भरविता येतील. विद्यार्थ्यांच्या आवडीच्या (प्रतिभेच्याही) विषयातील प्रगत ज्ञान , कौशल्ये तेथे प्राप्त करता येतील.

- **<u>अलग प्रशिक्षण:</u>**

१९६० पूर्वीच्या संशोधनांचा निष्कर्ष असा होता की, एकत्र शिकण्याऐवजी अलग प्रशिक्षणाने प्रज्ञावान विद्यार्थ्यांना खूपच फायदा होतो, परंतु सध्याच्या संशोधनाचे निष्कर्ष सांगतात की, केवळ त्यांना अलग केले म्हणजे आपली जबाबदारी संपली नाही. सामान्य मुलांपासून अलग काढून त्यांना कोणत्या प्रकारचे अनुभव आम्ही देणार आहोत यावर त्यांचा विकास अवलंबून आहे.

<u>१. स्वयंपूर्ण वेगळे ( विशेष ) वर्ग</u> : अशा वर्गामुळे प्रज्ञावान मुलांना स्वतःसारख्याच इतरांबरोबर काम करण्याची संधी मिळते, तज्ज्ञ व विशेष निवड कलेल्या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते, त्यांच्या गरजांशी नाते सांगणारा सुसंबद्ध अभ्यासक्रम मिळतो,ज्यामुळे त्यांच्या विकासाला चालना मिळते.

<u>२. तात्पुरते वेगळे काढणे :</u> दिवसाचा काही वेळ या मुलांनी इतर मुलांबरोबर अभ्यास करावयाचा व काही वेळ वेगळ्या ठिकाणी, आपल्या प्रतिभेच्या क्षेत्रात काम करावयाचे.

<u>३. छोटे गट करणे :</u> गावातील किंवा शहरातील सर्व शाळांनी एकत्र येऊन एकेका क्षेत्रातील विशेष अभ्यासाच्या सोयी (उदा. संगीत, विज्ञान, गणित इत्यादी) उपलब्ध करून दिल्या तर गावातील सर्व प्रज्ञावान मुलांना सात दिवसांचा किंवा आठवड्याचा काही वेळ आपापल्या आवडीच्या क्षेत्रात काम/ अभ्यास/ प्रगत वाचन/ प्रकल्प करावयास संधी मिळेल.

<u>४.वेगळया शाळा :</u> एकाच शाळेत प्रज्ञावान मुलांसाठी वेगळे वर्ग करण्यापेक्षा एखाद्या जिल्ह्यासाठी प्रज्ञावान विद्यार्थ्यांची वेगळी शाळा सुरू करता येईल. पुण्याला 'ज्ञानप्रबोधिनी' ही अशी एक शाळा आहे. येथे बुद्धिमत्ता व सर्जनशील यांच्या कसोटयाचा उपयोग करून प्रज्ञावान ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्वीकारलेल्या नवोदय विद्यालय योजनेसारखे अनेकविध उपक्रम राबविता येतात.

- **शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा क्षेत्र संकल्पना :**

शालेय स्तरावर प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षा खालीलप्रमाणे :

| अ.नं | परीक्षेचे नाव | विषय | गुण | वेळ | शिष्यवृत्ती | अधिक माहितीसाठी वेबसाईट |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) | पेपर १ (प्रथम भाषा व गणित) | १५० | ०१ ता.३० मि. | १०० /- दरमहा | https://www.mscepune.in/ |
| | | पेपर २ (तृतीय भाषा व बुद्धिमत्ता) | १५० | ०१ ता.३० मि. | | |
| २. | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी.) | पेपर १ (प्रथम भाषा व गणित) | १५० | ०१ ता.३० मि. | १५० /- दरमहा | https://www.mscepune.in/ |
| | | पेपर २ (तृतीय भाषा व बुद्धिमत्ता) | १५० | ०१ ता.३० मि. | | |
| ३. | जवाहर नवोदय विद्यालय – प्रवेश परीक्षा (इयत्ता – ६वी.) | मानसिक क्षमता चाचणी | ५० | १ तास | इ.६ वी.मध्ये प्रवेश | https://navodaya.gov.in/ |
| | | अंकगणित चाचणी | २५ | ३० मि. | | |
| | | भाषा चाचणी | २५ | ३० मि. | | |
| ४. | राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) इयत्ता ८ वी. | पेपर १ (बौद्धिक क्षमता चाचणी) | ९० | ०१ ता.३० मि. | १००० /- दरमहा | https://nmms.mscescholarshipexam.in// |
| | | पेपर २ (शालेय क्षमता चाचणी) | ९० | ०१ ता.३० मि. | | |
| ५. | अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश परीक्षा (AISSEE) इयत्ता ६ वी. व इयत्ता ९ वी. | गणित | १०० | ०२ ता.३० मि. | इ.६ वी. मध्ये प्रवेश | https://www.sainiksatara.org/ |
| | | सामान्य ज्ञान | ५० | | | |
| | | भाषा | ५० | | | |
| | | बुद्धिमत्ता | ५० | | | |
| | | गणित | १०० | ०२ ता.३० मि. | इ.९वी. मध्ये प्रवेश | https://aissee.nta.nic. |
| | | इंग्रजी | ५० | | | |
| | | सामान्य विज्ञान | ५० | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सामाजिक शास्त्र | ५० | | | in/ |
| | | बुद्धिमत्ता | ५० | | | |
| ६. | **राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज ,डेहराडून(RIMC) प्रवेश पात्रता परीक्षा (इयत्ता – ८ वी.)** | इंग्रजी | १२५ | २ तास | इ.८ वी. मध्ये प्रवेश | https://www.rimc.gov.in |
| | | गणित | २०० | ०१ ता.३० मि. | | |
| | | सामान्य ज्ञान | ७५ | ०१ तास | | |
| ७. | **राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इयत्ता १० वी.** | पेपर १ (बौद्धिक क्षमता चाचणी) | १०० | ०२ तास | (१२ वी. पर्यंत १२५० /- दरमहा) (पदव्युत्तर पर्यंत २०००/- दरमहा) | https://nts.msceschol arshipexam.in// |
| | | पेपर २ (शालेय क्षमता चाचणी) | १०० | ०२ तास | | |

**शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा तक्ता**

- **डोंगरी क्षेत्र संकल्पना :**

डोंगर - दऱ्यांनी युक्त, वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने दुर्गम अशा प्रदेशात देखील अनेक वाड्या वस्त्यामध्ये असंख्य आदिवासी बांधव वस्ती करून राहत आहेत. डोंगर दऱ्यामुळे रस्ते, वीज, दळणवळण व्यवस्थेच्या अपुऱ्या सोयी यांमुळे अशा भागात पुरेशा भौतिक सुविधा बऱ्याचदा उपलब्ध होऊ शकत नाहीत. अशा दुर्गम प्रदेशातील शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक, मुख्याध्यापक, आणि पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणजे डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्व. भौतिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीयदृष्ट्या मागे असलेल्या अशा दुर्गम व समस्याग्रस्त प्रदेशात शासनामार्फत विद्यार्थ्यांना त्यांचा मुलभूत शिक्षण हक्क प्राप्त करून देण्याची जबाबदारी सोपविलेले शिक्षक व मुख्याध्यापक यांची भूमिका खूपच महत्वपूर्ण ठरते. अशा ठिकाणी शालेय नेतृत्वाचा खऱ्या अर्थाने कस लागतो. मात्र सक्षम शालेय नेतृत्व अशा प्रतिकूल परिस्थितीत देखील आपली भूमिका यथायोग्यरीत्या पार पाडू शकते.

- **रत्नागिरी जिल्हा**

महाराष्ट्र राज्याच्या कोकण प्रदेशातील रत्नागिरी जिल्ह्याचे क्षेत्रफळ क्षेत्रफळ ८,२४९ चौ. किमी. असून ते राज्याच्या २·७% आहे. लोकसंख्या १६,१५००० (२०११) आहे. जिल्ह्याची उत्तर–दक्षिण लांबी सु. १८० किमी. असून पूर्व–पश्चिम विस्तार सरासरी ६४ किमी आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तरेला रायगड जिल्हा, पूर्वेला सह्याद्री पर्वताच्या रांगा व त्याचप्रमाणे सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हे, दक्षिणेला सिंधुदुर्ग जिल्हा, पश्चिमेला अरबी समुद्र आहे. सांप्रतच्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा मिळून पूर्वी रत्नागिरी हा १५ तालुक्यांचा एकच जिल्हा होता परंतु १ मे १९८१ पासून रत्नागिरी जिल्ह्याचे रत्नागिरी व सिंधुदुर्ग अशा दोन जिल्ह्यांत विभाजन करण्यात आले. उत्तरेस सावित्री नदीपासून दक्षिणेस शुक नदीपर्यंतचा रत्नागिरी जिल्हा व त्याच्या दक्षिणेकडील तेरेखोल खाडीपर्यंतचा सिंधुदुर्ग जिल्हा होय. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, चिपळूण, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजे व राजापूर असे एकूण नऊ तालुके आहेत. सर्वांत उत्तरेला मंडणगड तालुका व सर्वांत दक्षिणेला राजापूर तालुका आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण सहा तालुके डोंगराळ व दुर्गम भागामध्ये येतात.

प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यशोगाथा तयार करण्यासाठी प्रामुख्याने शहर व खेडे या दोन प्रकारातून दोन शाळांची निवड केलेली आहे. मोड्युलसाठी निवडण्यात आलेल्या दोन्ही शाळांनी प्राप्त परिस्थितीत अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपले यश संपादन केलेले आहे.

- **शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेसंदर्भात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने (शहरी):**

**पालकांशी संबंधित आव्हाने**

१. कौटुंबिक वाद-विवाद, आर्थिक विवंचना

२. अंधश्रद्धेचा पगडा, शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था

३. व्यसनाधीनतेचे अधिक प्रमाण

४. पाल्यांना शैक्षणिक कारणांसाठी वेळ देऊ शकत नाही

५. शाळेतील नियम व शिस्तीकडे दुर्लक्ष

**समाजाशी संबंधित आव्हाने**

१.गुणवत्ता, पैसा या दृष्टिकोनातून शाळेकडे बघण्याचा चष्मा

२. सीएसआर उभारण्यात बऱ्याच अडचणी

३. शाळेविषयीच्या आपुलकीचा अभाव

४.सरकारी शाळा म्हणून नकारात्मक दृष्टिकोन

५. श्रमजीवी वर्गातील मुलांचे प्रमाण अधिक

**विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने**

१.भिन्न क्षमता असलेले विद्यार्थी

२.बाल कामगारांची समस्या

३.बहुभाषिक विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक

४.अनियमित उपस्थिती

५. घरी शैक्षणिक वातावरणाचा अभाव

६.अभ्यासाचा कंटाळा

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने**

१. शिक्षकांच्या बदल्या

२.मान्य शिक्षक व शाळेत कार्यरत शिक्षक यांचे विसंगत प्रमाण

३.कामाचा अतिरिक्त ताण

४.शाळेव्यतिरिक्त इतर अशैक्षणिक कामाचा ताण

५.पोषण आहाराचे अतिरिक्त काम

६.शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध नाही

## शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेसंदर्भात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने (ग्रामीण):

**पालकांशी संबंधित आव्हाने**

१.शासकीय कागदपत्रांविषयी अनभिज्ञ

२.व्यसनाधीनता, रूढी-परंपरांचा पगडा

३.आर्थिकदृष्ट्या कमकुवत

५.स्पर्धा परीक्षांविषयी अनभिज्ञ

६.पाल्याच्या प्रगतीविषयी अनभिज्ञ

७. भविष्यातील संधीविषयी जाणिवेचा अभाव

**समाजाशी संबंधित आव्हाने**

१. गावपातळीवरील राजकारण, अंधश्रद्धेचा पगडा

२.शाळेकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन

**इतर आव्हाने**

१.मूलभूत सुविधांचा अभाव, नेटवर्कची अडचण

२.दळणवळण सुविधेचा अभाव

३. उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य

४.मुसळधार पावसाचा प्रदेश

५. भौगोलिक दृष्ट्या प्रतिकूल परिस्थिती/दुर्गम भाग

**विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने**

१.कौटुंबिक कामाचा ताण

२. बोली भाषेचा पगडा

३.मूलभूत संकल्पना अस्पष्ट, आत्मविश्वासाचा अभाव

४.संदर्भ साहित्याची उणीव, सराव संचाचा अभाव

५.भिन्न क्षमता असलेले विद्यार्थी

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने**

१.ग्रामीण व दुर्गम भागात काम करण्यास तयार नसणे.

२.मान्य व कार्यरत शिक्षक विसंगत प्रमाण

३.संदर्भ साहित्याची अनुपलब्धता

४. मार्गदर्शनाचा अभाव

५.प्रशासकीय अडचण

आ.क्र. – ६ शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेसंदर्भात शालेय नेतृत्वासामोरील आव्हाने(ग्रामीण)

# शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसंदर्भात यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास

## यशोगाथा -१

## नगर परिषद शाळा क्रमांक १५ दामले विद्यालय

**तालुका-- रत्नागिरी, जिल्हा--रत्नागिरी**

- ✓ मुख्याध्यापक : श्री.प्रकाश जाधव (६ जून २०१० ते आजअखेर)
- ✓ शाळेच्या यशोगाथेच्या व्हिडीओची लिंक - https://youtu.be/nDMx7syVe64
- ✓ शिक्षक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/SvZkPZiUdJs
- ✓ ग्रामस्थ व पालक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/MG1a9HHFpUE
- ✓ शाळेची प्रसार माध्यमांनी घेतलेली दाखल - https://youtu.be/MAeqjQH0Wfk

श्री. प्रकाश जाधव,रत्नागिरी नगर परिषद शाळा क्रमांक १५ दामले विद्यालय या शाळेचे मुख्याध्यापक आहेत. १९८७ पासून ते शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाले. तर १९९३ मध्ये त्यांना मुख्याध्यापक म्हणून बढती मिळाली. दामले विद्यालय रत्नागिरी येथे ते ६ जून २०१० पासून ते आजतागायत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. दामले विद्यालय ही रत्नागिरी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणारी शाळा आहे. शाळेचा पूर्व इतिहास पाहिला तर 'पटसंख्या चांगली असणारी शाळा' अशी या शाळेची ख्याती होती. पण २०१३-१४ पर्यंत मात्र या शाळेची पटसंख्या पाचशे वरून ३०० च्या आसपास आली होती. ही शाळेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक बाब होती. मुख्याध्यापक म्हणून आपल्यासाठी हे नक्कीच भूषणावह नाही, हे जाधव सरांनी मनोमन जाणलं. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना एकत्र घेऊन शाळेची वेगळी मोट बांधण्याचं मुख्याध्यापकांनी ठरवलं.

मुख्याध्यापकांनी आपल्या सहकारी शिक्षकांच्याबरोबर चर्चा करून पटसंख्या कमी होण्याची कारणे शोधून काढली. यामध्ये पालकांमधील इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे वाढते आकर्षण, शाळेजवळच्या इतर माध्यमिक शाळांना जोडून सुरू झालेले प्राथमिकचे वर्ग, नगर परिषद प्रशासनाच्या नावाने सुरू झालेल्या शाळेच्या परिसरातील आणखी दोन शाळा,सरकारी शाळांकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन, शाळेच्या भौतिक सोयीसुविधा, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आवश्यक विविधांगी उपक्रम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव ही कारणे प्रामुख्याने त्यांच्या लक्षात आली.

मुख्याध्यापकांनी आपल्या कौशल्याने प्रथम 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे ब्रीद नजरेसमोर ठेवत शाळेच्या प्रगतीसाठी झटण्यास शिक्षक, पालक आणि समाजातील शाळा हितचिंतकांची फळी निर्माण केली. आपली शाळा पुन्हा नावारुपाला आणण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या विविधांगी गुणवत्तेचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला. यातून प्रत्येक मूल वेगळे आहे, त्याच्या क्षमता वेगळया आहेत, त्याच्या अंगी कलागुण वेगवेगळे आहेत याची जाणीव ठेवून गुणवत्तापूर्ण व संस्कारक्षम शिक्षणाची हमी देत शाळेने वेगवेगळे प्रयत्न सुरू केले.

मुख्याध्यापक व शिक्षकांनी सुरूवातीचे ध्येय ठरविले की, शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा व शाळाबाह्य स्पर्धा परीक्षांमध्ये (उदा. MTS व BDS) मुलांना यश संपादन करून देणे. यासाठी शिक्षकांची चांगली पुनर्बांधणी केली. प्रत्येक शिक्षकाला त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांचे कलागुण, वैशिष्ट्ये व आवड लक्षात घेऊन शाळेतील प्रत्येक कामात सहभागी करून घेतले. उदाहरणात क्रीडा, संगीत, विज्ञान, साहित्य, गणित व भाषा यांसारखे आवडीचे विषय शिक्षकांमध्ये त्यांच्या आवडीप्रमाणे वाटून दिले. त्यामुळे शिक्षकांना आपल्या कामात सर्वोत्तम सादरीकरण करणे शक्य झाले. शिक्षकांवरील प्रशासकीय कामाचा असणारा ताण आपल्या कुशल नेतृत्वाने दूर केला. त्यातून सर्व शिक्षकांमध्ये मुख्याध्यापकांविषयी आदराची व आपुलकीची भावना निर्माण झाली. शाळेत 23 शिक्षक मंजूर असताना प्रत्यक्षात फक्त 19 शिक्षकच कार्यरत आहेत,तरीसुद्धा स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी सकाळी व संध्याकाळी शाळेत घेतल्या जाणाऱ्या मोफत जादा तासिका यांसाठी समयदान करण्यास सर्व शिक्षक नेहमीच उत्सुक असतात. शाळेतील महिला शिक्षिकांचे प्रमाण जास्त असूनही या सर्व महिला भगिनी समयदानात अजिबात मागे राहत नाहीत. परीक्षेच्या काळात शनिवार-रविवार सुद्धा मार्गदर्शन वर्गांचे शाळेत आयोजन केले जाते. आपल्या वर्गाचे

जास्तीत जास्त विद्यार्थी एमटीएस,बीडीएस या शाळाबाह्य स्पर्धा परीक्षांमध्येसुद्धा गुणवत्ता यादीमध्ये कसे येतील यासाठी सर्व शिक्षकांमध्ये निकोप चढाओढ सुरू असते.

पूर्वी शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी आणि सातवी इयत्तेसाठी घेतल्या जात. दामले शाळेतील इयत्ता चौथीमध्ये शिष्यवृत्तीमध्ये यश मिळविलेले विद्यार्थी नंतर इतर शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे प्रमाण अधिक होते.त्यामुळे गुणवंत विद्यार्थी शाळेबाहेर जाण्याचा ओघ वाढलेला होता. अशावेळी मुख्याध्यापकांनी या समस्येच्या मुळाशी जाऊन शोध घेतला. पालकांचे उद्बोधन करून सर्व विद्यार्थी आपल्या शाळेत राहतील याची काळजी घेतली. पालकांमध्ये असलेले सेमी इंग्रजी शाळांविषयीचे आकर्षण लक्षात घेऊन व विविध उपक्रम यांचा विचार करून आपल्या शाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग इयत्ता पहिलीपासून सुरू केले. बालवाचनालय, वर्षा सहल, प्राचीन कोकण, प्राचीन व्यावसायिकांची ओळख, श्रावणधारा - पावसाळयातील गाणी, उटणे - राख्या - आकाश कंदील यांसारखे कार्यानुभव चे उपक्रम, लोकधारा - स्नेहसंमेलन, अभिरूप बाजार, औषधी वनस्पतींचे प्रदर्शन, परिपूर्ण आहार, वस्तू प्रदर्शन दिव्यांचा प्रवास दिवटी पासून बिजली पर्यंत,बाल निवडणूक, मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी - उपस्थिती ध्वज, विज्ञान प्रयोगशाळा, वाढदिवसाला झाड भेट व पारंपरिक खेळ यांसारखे विविध उपक्रम सुरु केले.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवायचे असेल तर आपल्या नियोजनामध्ये पालकांचा सहभागसुद्धा महत्त्वाचा आहे. हे ओळखून मुख्याध्यापक व शिक्षकांनी पालकांमध्ये जाणीव जागृती निर्माण केली. या शाळेचे बहुतांश पालक श्रमजीवी वर्गातील आहेत. पालकांचे व्यवसाय प्रामुख्याने घरकाम, गवंडीकाम, सेंट्रींग काम, ट्रक चालक, वडापावची गाडी, मजुरी, सुतारकाम, प्लंबिंग, रिक्षा ड्रायव्हर, गादी कारखाना, लॉन्ड्री मध्ये कामगार, वॉचमन, भाजी विक्री करणे यांसारखे सर्वसामान्य वर्गातील पालक तसेच खाऊ गल्ली मधील हातगाड्यांवर काम करणारे कामगार, आइस्क्रीमच्या गाड्यांवर काम करणारे कामगार, भिन्न आर्थिक व सामाजिक स्तराची पार्श्वभूमी असणारे पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक गरजा पुरवण्यासाठीसुद्धा असमर्थ आहेत. त्यांच्यासमोर असणाऱ्या दैनंदिन रोजगाराच्या चिंतेमुळे शाळेसाठी व पाल्यासाठी वेळ देणे हीच त्यांच्यासाठी दुरापास्त गोष्ट, त्यातून येणा-या निराशेने काही पालक व्यसनाधीन झाले आहेत. काही पालक तर राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, नेपाळ व कर्नाटक या इतर राज्यांतील विविध ठिकाणाहून शहरात आलेले. त्यांचे व्यवसायही आंबा बागेत मजुरी करणे, आईस्क्रीम, पाणीपुरी, भेळ, रगडा, दालबाटी, मिठाईच्या दुकानात व उडपी हॉटेलमध्ये काम करणे असे विविधांगी स्वरूप आहेत. त्यामुळे काही पालकांचे वर्षातून एक वेळा गावाकडे स्थलांतराचे प्रमाणदेखील अधिक दिसून येते. पालकांमध्ये शिक्षणाविषयी प्रचंड मोठी अनास्था असल्याचे देखील दिसून आले. अशावेळी अशा पालकांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवून देताना बऱ्याच अडचणींना शाळेला सामोरे जावे लागले. यासाठी मुख्याध्यापकांनी पालक व शाळा यांचा संबंध दूर व्हावा यासाठी वेगवेगळे उपक्रम सुरू केले. दिवसभर रोजगाराच्या चिंतेत असणारा पालक शाळेतील बैठकांना येऊ शकत नसल्याने 'एक विलक्षण दिवस' सारखा रात्रीच्या दप्तर मुक्त शाळेचा उपक्रम शाळेने राबविला. त्यामुळे शाळेमध्ये नवीन काय चाललंय, शाळा आपल्या पाल्यासाठी किती कष्ट घेते याचा अनुभव पालकांना आला. शाळेशी संबंधित दुरुस्तीचे बांधकामाचे काम आपल्या शाळेच्या पालकांनाच देण्याचा प्रघात शाळा व्यवस्थापनाने पाडला. शाळेतील शिक्षकांनी राबविलेल्या 'नाती जपता जपता' यां उपक्रमातून संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी झालेला प्रयत्न पालकांना खूप भावला. नंतरच्या टप्प्यात पालक आपले रोजगार बुडवून शाळेतल्या बैठकांना उपस्थित राहू लागले. पालकांच्या मदतीने स्पर्धा परीक्षेसाठी पालक व विद्यार्थी यांचे दैनंदिन वेळापत्रकच पालकांना शाळा ठरवून देऊ लागली. ज्यामध्ये टीव्हीवरील कोणते कार्यक्रम पहावे, परीक्षा काळातील आहार काय असावा, अभ्यासाला बसण्याची दिशा कोणती असावी, बैठक कशी असावी, अभ्यासाची व विश्रांतीची वेळ, झोपेच्या सवयी व अभ्यासाला बसण्याच्या ठिकाणी आपण या स्पर्धा परीक्षेत किती टक्के यश मिळविणार याचा मोठा तक्ता वर्षाच्या सुरुवातीलाच लावणे. यांसारख्या बारीकसारीक गोष्टींचा समावेश करण्यात आला, यातून पालकांनाही या वेळापत्रकाचे महत्त्व पटू लागल्याने तेही सहकार्य करू लागले.

मुख्याध्यापक व शिक्षक अंगणवाडी पासूनच मुलांचा आर्थिक किंवा बौद्धिक स्तर विचारात न घेता सर्व मुले समान आहेत या पद्धतीने प्रत्येक उपक्रमाचे नियोजन करतात. मुलांमध्ये शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कोणतेही

गट न करता कृतियुक्त अध्यापन केले जाते. स्पर्धा परीक्षेसाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. सामान्यज्ञानावर आधारित 'कोण होणार विजेता' स्पर्धा, शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक अभिवृत्ती विकासाचे बीजारोपण, यांतून भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षेचा पाया अधिक भक्कम केला जात आहे. स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, गुणवत्ता यादी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांच्या फोटोसह शाळेच्या दर्शनी भागात, शहरातील मुख्य चौकात बॅनर लावून प्रसिद्धी देणे, यातून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नकळतपणे प्रेरणा मिळत राहते.

शाळेला गुणवत्तेमध्ये अग्रेसर ठेवण्यासाठी मुख्याध्यापक नेहमीच चाकोरीबाहेर जाऊन निर्णय घेतात. झटपट निर्णय घेण्याची व त्या निर्णयाशी ठाम राहण्याची मुख्याध्यापकांकडे क्षमता आहे, यामुळेच मुख्याध्यापकांनी पहिलीपासूनच सेमी इंग्रजीचे वर्ग शाळेत सुरू केले व याचा फायदा पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना होत आहे. शाळेला अंगणवाडी जोडून असेल तर पटाचा प्रश्न निर्माण होणार नाही ही बाब लक्षात घेऊन प्रशासकीय पातळीवर अडथळे असतानासुद्धा शाळेच्या आवारातच चार नवीन अंगणवाड्या सुरू करण्याचा धाडसी निर्णय, प्रसंगी आर्थिक भार सोसून मुख्याध्यापकांनी घेतला व तो यशस्वी केला. नवीन बालवाडी ताईंचा वार्षिक २,४०,०००/- रुपये पगार मुख्याध्यापक व शिक्षक स्वतःच्या पगारातून आर्थिक मदत करून उभा करीत आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे श्री. योगेश कदम, श्री. रवींद्र शिंदे, श्रीमती. पूर्वा मिरकर, श्रीमती. सुलेखा काझी हे सर्व शिक्षक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी झोकून देऊन काम करीत होते. अशातच मे २०१८ मध्ये या चार गुणवान शिक्षकांच्या बदल्या प्रशासनामार्फत इतर शाळांमध्ये केल्या गेल्या. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होऊ लागला. शिष्यवृत्ती परीक्षेचे यश आता थांबेल की काय असे पालकांना वाटायला लागले. मुख्याध्यापकांसमोर खूप मोठा प्रश्न उभा ठाकला. अशावेळी मुख्याध्यापकांनी पालक व विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेसंदर्भात विश्वास निर्माण केला. शाळेची पटसंख्या कमी होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष दिले. मुख्याध्यापकांनी स्वतः प्रशासनाला शाळेच्या दृष्टिकोनातून बदली झालेल्या शिक्षकांचे महत्त्व लक्षात आणून दिले व संबंधितांची बदली रद्द करण्यास प्रशासनाला भाग पाडले. बदली झालेल्या चार शिक्षकांपैकी वर्षभरामध्ये दोन शिक्षक परत शाळेत हजर झाले. मात्र दोन शिक्षकांच्या मार्गदर्शनाला शाळेला मुकावे लागले. तरीसुद्धा मुख्याध्यापकांनी शाळेच्या यशामध्ये कोणतीही तडजोड केलेली दिसून येत नाही. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शाळेच्या गुणवत्तेचा टक्का नेहमी वाढताच राहिला आहे.





शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन करताना दामले विद्यालयातील शिक्षक

शाळेचा भौतिक परिसर सुद्धा स्पर्धा परीक्षेसाठी उपयोगी होईल असा बनविण्याचा प्रयत्न केला आहे. शाळेच्या आवारात शास्त्रज्ञांचे माहितीचे फोटो लावण्यात आले आहेत. प्रत्येक वर्गामध्ये ज्ञानरचनावादानुसार भिंती बोलक्या केलेल्या आहेत. मुलांसाठी वेगळी विज्ञान प्रयोगशाळा तयार केलेली आहे. यातून स्पर्धा परीक्षेचा पाया भक्कम होण्यास मदत होते.

फक्त शालेय स्तरावर स्पर्धा परीक्षांमध्येच नाही तर इतर क्षेत्रांमध्येसुद्धा मुलांची प्रज्ञा ओळखून त्यांच्या प्रगतीसाठी साजेसे काम मुख्याध्यापक व शिक्षक करीत आहेत. बाह्य स्पर्धांमध्ये शाळा यशस्वी सहभाग नोंदवित आहे.कथाकथन, पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव यामध्ये शाळा


नेहमीच अग्रेसर आहे. तसेच रत्नागिरी नगरपरिषद आंतरशालेय क्रीडा स्पर्धेतही शाळा सर्वसाधारण नैपुण्यपद सातत्याने आपल्या पारड्यात ठेवत आली आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित बालनाट्य स्पर्धेत राज्यस्तरावर आत्तापर्यंत शाळेने तब्बल १८ पारितोषिके पटकावली आहेत. तसेच विज्ञान प्रदर्शनात शाळा राष्ट्रीय स्तरावर पोहोचलेली आहे.या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेली मुले त्यांच्या पुढील आयुष्यात देखील यशस्वी होताना दिसत आहेत.उदा.- स्पर्धा परीक्षेत यशस्वी गंधार जोशी पुढे व्यावसायिक चित्रपटात , प्रसाद तेंडुलकर CA फाऊंडेशन परीक्षेत देशात २४ वा, तन्वी भालेकर राज्यात भ.ज. प्रवर्गात कोकण बोर्डात १२ वीत प्रथम, सिक्कीम येथील विज्ञान प्रदर्शनात देशात शाळेचे नेतृत्त्व करणारी सीमा दसाणा ही विद्यार्थिनी कोकण बोर्ड मध्ये बारावी मध्ये एमसीव्हीसीमध्ये प्रथम आलेली आहे.

**रत्नागिरी नगर परिषद शाळा क्रमांक १५ दामले विद्यालय, रत्नागिरी**

**शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**

| अ.क्र. | स्पर्धा परीक्षेचे नाव | वर्ष | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2010 | 2011 | 2012 | 2013 | 2014 | 2015 | 2017 | 2018 | 2019 | 2020 | एकूण |
| 1 | शिष्यवृत्ती-इ,4 थी | 3 | 8 | 4 | 3 | 2 | - | - | - | - | - | **20** |
| 2 | शिष्यवृत्ती-इ. 7 वी | 0 | 0 | 0 | 0 | 5 | - | - | - | - | - | **5** |
| 3 | शिष्यवृत्ती-इ. 5 वी | - | - | - | - | - | - | 3 | 8 | 3 | 8 | **22** |
| 4 | MTS | 3 | 1 | 3 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **13** |
| 5 | BDS | 0 | 0 | 3 | 2 | 8 | 4 | 0 | 0 | 10 | 18 | **45** |
| **6** | **एकूण** | **6** | **9** | **10** | **11** | **15** | **4** | **3** | **8** | **13** | **26** | **105** |

**शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**




**आलेख - शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**

शाळेचा बोलका परिसर,शिक्षकांची अफाट इच्छाशक्ती, मुख्याध्यापकांची प्रचंड मेहनत करण्याची तयारी, पालक आणि समाजाची शाळेप्रति बदललेली मानसिकता आणि शाळा व्यवस्थापनाचे नियोजन यांची घातली गेलेली उत्कृष्ट सांगड हेच या शाळेच्या वाढत्या पटाच्या यशाचं गुपित आहे. सलग आठ वर्षे शाळेचा पट चांगल्या संख्येने वाढत असल्याने आज शाळेने ९०० विद्यार्थी संख्येचा टप्पा पार केलेला आहे. अंगणवाडीमध्ये २४५ हून अधिक विद्यार्थी सध्या प्रवेशित आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये आजअखेर २२५ हून अधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीमध्ये आपले नाव मिळविले आहे. प्रचंड मेहनत करूनही सरकारी शाळांची होणारी पिछेहाट, घटत जाणारी पटसंख्या आणि त्यातून निराश होऊ घातलेल्या शिक्षक वर्गाला दामले विद्यालय, रत्नागिरीचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश जाधव व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक या टीमचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे.

- **चिंतनात्मक प्रश्न**

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी वेगवेगळी सामाजिक, सांस्कृतिक,प्रादेशिक व धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या तसेच बहुसंख्येने श्रमजीवी वर्गातून दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेयस्तरावरील स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देत असताना कोणती आव्हाने मुख्याध्यापक श्री. प्रकाश जाधव सरांच्या समोर होती व त्यावर त्यांनी कशी मात केली ?

- **चर्चा करूया, विचार करूया**

आपल्या वर्गात भिन्नभिन्न सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी आहेत, त्यांचे पालक श्रमजीवी वर्गाचे प्रतिनिधित्व करतात,दैनंदिन काम कष्टाचे असल्यामुळे घरात आपल्या पाल्यांना वेळ देऊ शकत नाहीत. अशावेळी आपण शिक्षक म्हणून संबंधित विद्यार्थ्यांची प्रतिभा ओळखून त्याला आपल्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी कशा पद्धतीने नियोजन कराल?

## यशोगाथा – २

### जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा, भडे नं- १

**तालुका – लांजा, जिल्हा - रत्नागिरी**

- ✓ मुख्याध्यापक : श्री.संदीप भीवा पावसकर (०१/०६/२०११ ते ०२/०५/२०१९)
  श्रीम. प्राजक्ता राहटे ( ०३/०५/२०१९ ते आजअखेर)
- ✓ शाळेच्या यशोगाथेच्या व्हिडीओची लिंक - https://youtu.be/vakvyeuwvBU
- ✓ मुख्याध्यापक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/VPagJ8CHzjE
- ✓ शिक्षक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/lxKGaU2GpSY
- ✓ ग्रामस्थ व पालक मनोगत व्हिडीओची लिंक - https://youtu.be/Ux3ErhPGrPs
- ✓ शाळेची प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल व्हिडीओची लिंक - https://youtu.be/Tdz87Tc5axk

"गुरुजी' चाललाव ना आम्हास्नी सोडून ?,जायचेच होते तर जीव कशाला लावलात?"

"मुले रडताहेत हो रोज घरी. बदल्या रद्द नाही का होणार?"

"आमच्या गुरुजींची बदली झाली. आता मज्जा नाय शाळेत... पोरा म्हणतायेत... जरा समजवा त्यास्नी.... तुम्ही"

"पावसकर गुरुजी असताना जल्ली धास्ती नवती ओ कसली!"

"आमच्या पोरास्नी चांगला शिक्षण दिलाव, तब्येतीस जपा. आम्हासनी इसरू नका."

हे बोल आहेत जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा भडे नं-१ या शाळेतील शिक्षकांच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगीचे. रत्नागिरी जिल्ह्याच्या डोंगराळ, दुर्गम लांजा तालुक्यात असलेले गाव म्हणजे 'भडे'. तालुक्याच्या पश्चिमेकडे राजापूर, लांजा व रत्नागिरी तालुक्यांना मध्यवर्ती पण अतिदूर. प्रमुख व्यवसाय शेती. गावातील लोकांत मोलमजुरी व चाकरमानी म्हणून मुंबईमध्ये काम करण्याचे प्रमाण अधिक. गावात पूर्वापार चालत असलेल्या प्रथा-परंपरा, विद्यमान सरपंच श्री.सुधीर तेंडुलकर आणि सहकाऱ्यांच्या मदतीने गावात काही सुधारणा होत असल्या तरी दोन वर्षांपूर्वी याच गावात साधी मोबाईलची रेंज नव्हती. वाड्या वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा अभाव होता. गावात आजही ठराविक एस.टी. जातात. पावसात विजेचा कायम खेळखंडोबा. "भडे भडे सोन्याचे कडे, बघून येई रडे", असे पूर्वी म्हणत होते, ते खरे वाटण्याजोगे. शाळेत मुले जवळपास पाच किलोमीटर अंतर पायी चालून दाखल

होत. अशा शाळेत मुख्याध्यापक श्री संदीप पावसकर २०११ मध्ये मुख्याध्यापक या पदावर रुजू होतात. त्यांचे सहकारी शिक्षक श्री. सुहास वाडेकर हे २०१४ मध्ये त्यांच्या मदतीला धावून जातात. या शाळेत हजर होत असताना मात्र शाळा घेताना, 'भडे नको' असा बऱ्याच जणांचा सूर निघाला. 'तक्रारीची शाळा' म्हणून पंचक्रोशी मध्ये प्रसिद्ध असणारी शाळा नावारुपास आणणे जिकिरीचे काम होते.तत्कालीन मुख्याध्यापक श्री. संदेश पावसकर याचे श्रेय त्यांच्या सहकाऱ्यांना देतात. मुख्याध्यापकांनी सन २०१४ मध्ये आरटीईच्या नियमानुसार शाळा व्यवस्थापन समितीला हाताशी घेत इयत्ता आठवीचा वर्ग जोडण्याचे धाडस केले. हे धाडस करीत असताना ग्रामस्थांमधून व आजूबाजूच्या माध्यमिक शाळांमधून प्रचंड विरोध त्यांना सहन करावा लागला. सुरुवातीच्या टप्प्यात एकाच वेळी सात शिक्षकांच्या बदल्या करणारे गाव म्हणून भडे तालुक्यात चर्चेला आले होते. मुख्याध्यापक, शिक्षक, समाज आणि पालक यांच्यात निर्माण झालेला पराकोटीचा दुरावा, शिक्षक आणि शिक्षण व्यवस्था यांच्या मनात भडे गावाची, पर्यायाने शाळेची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्याचा विडा तत्कालीन मुख्याध्यापक श्री. संदिप पावसकर सर यांनी उचलला. मुख्याध्यापक व त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी पहिले पाऊल उचलले ते म्हणजे 'शालेय आधार समिती' हा पर्याय गावासमोर ठेवला. गावातील सर्व स्तरांतील लोकांचा समावेश हा यामागची मूळ संकल्पना. तसेच राजकारण विरहित एकजूट हे समितीचे प्रमुख वैशिष्ट्य. म्हटलं तर अनेक लोक शाळेशी संबंधित होते, पण आता स्वत:ची मुले शाळेत नसल्याने ते दुरावले होते. काहीजणांना स्थानिक राजकारणाने ग्रासले होते. सध्या शाळांमध्ये पालकांव्यतिरिक्त अन्य लोकांना समित्यांमध्ये स्थान देता येत नसल्याने इच्छा असूनही लोकांना म्हणावे तसे योगदान देता येत नव्हते. अशा सर्वांनाच प्राधान्य देऊन शाळेचा विकास साधायचा, हा प्रमुख हेतू ठेवून शिक्षकांनी ग्रामस्थांना लेखी आमंत्रण दिले आणि त्याचा पाठपुरावा केला. 'व्यसनाधीनता, अंधश्रद्धा व पारंपरिकता' याने पिचलेले गावकरी शाळेच्या भौतिक सुविधेत खारीचा वाटा उचलू लागले. शिक्षकांचा शब्द प्रमाण मानून पायाला भिंगरी बांधून बायाबापड्या पळू लागल्या. भव्य दिव्य रंगमंच बांधण्यासाठी दागिने गहाण ठेवले, शाळा डिजिटल करण्यासाठी दिवसभर पोटाला चिमटा काढून शालेय आधार समितीने रात्री लोकांचे उंबरठे झिजवले. सीएसआर फंडातून 'बोलका फरशी प्रकल्प' राबविणारी ही पहिली शाळा. सुसज्ज प्रयोगशाळा, वाचनालय, फिरत्या खुर्च्या आणि भाऊबीज भेटीतून रंगलेल्या शाळेने कात टाकून लोकांच्या सहकार्यातून नवे रुपडे धारण केले.



विज्ञानातील प्रयोग करताना इ. ८ वीचा विद्यार्थी



हसत खेळत शिक्षण- गटकार्य करताना शाळेतील विद्यार्थी

मुख्याध्यापक मात्र मुलांच्या बाबतीत असमाधानी. कारण प्रत्येक मूल शिकले पाहिजे याचा आग्रह जरी शिक्षकांनी धरला असला तरी आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुले पैशासाठी घरगुती कामात व्यस्त होती. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शाळा सोडून मुंबईला जाऊन मिळेल ते काम करण्याची प्रथाच या गावात रुजली होती. हे कुठेतरी थांबले पाहिजे, मुले शिकली पाहिजेत, स्वतःच्या हिमतीवर ती शिकली पाहिजे. त्यासाठी त्यांना आपण स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आर्थिक आधार मिळवून दिला पाहिजे, हे ध्येय निश्चित करून मुख्याध्यापकांनी नियोजन करायला सुरुवात केली. ग्रामीण भागामध्ये स्पर्धा परीक्षेत यश मिळविणे हे सोपं काम नाही, कारण या शाळेतील मुले घरात सकाळी पाणी भरणे, पऱ्यावर धुणी धुणे, घर कामात मदत करणे, शेती कामात मदत करणे, पावसाळयात धुवाधार पावसात शेती कामात मदत करणे,पारंपारिक शिमगोत्सवात बाहेरगावी खेळे जाणे, देव-

देवस्कीत गुरफटणे, शेजाऱ्यापाजा-यांच्या वादात भरडणे, पालकांच्या आपापसातील कुरबुरींना बळी पडणे, आई-वडील जवळ नसणे, पुरेशा वह्या-पुस्तके नसणे, कपडालत्ता चप्पल यांची आबाळ, व्यसनाधीनता व पालकांमधील न्यूनगंड अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना आत्मविश्वास नव्हता. पालक आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत जागरूक नव्हते. यासाठी सर्वांना एकत्र घेऊन अध्ययन-अध्यापनात विविध तंत्रांचा वापर करणे गरजेचे होते. मुख्याध्यापकांनी व त्यांच्या टीमने या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून ध्येयवाक्य ठरविले. 'एकच ध्यास शाळेचा विकास'. यातून वारंवार मिटिंग होऊ लागल्या. अध्यापनाच्या विविध पद्धतींवरती चर्चा झडू लागल्या.बहुवर्ग अध्यापन कसे करावे, त्याचे सादरीकरण कसे असावे,वर्गा - वर्गाचा आढावा घेत प्रत्येक मुलाच्या प्रगतीचा शोध घेतला. इयत्तावर शिक्षक न मानता 'शाळेसाठी शिक्षक' ही संकल्पना स्वीकारली.प्रत्येक शिक्षक प्रत्येक मूल शिकावे, याकरिता धडपडू लागले. मिळेल त्या वर्गाचे काम मनापासून करू लागले. प्रत्यक्षात वर्ग ८, शिक्षक मात्र ४ ही अडचण कुणीच पुढे आणली नाही. सर्वांनी एकत्र येऊन मुलांच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. स्पर्धा परीक्षेसाठी प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीचे नियोजन केले गेले. पाठांतर करून हॉलमध्ये परिपाठ सादर करणे, शिक्षकांनी त्याचे समीक्षण करणे, कृतियुक्त अध्यापन, ज्ञानरचनावाद, एलबीएलचा स्वीकार, यासह श्रावणधारा, गाथा क्रांतिकारकांची, पाटी आणि पोळी, शारदीय संस्कार कथा, साने गुरुजी कथामाला, भाऊबीज भेट कार्ड प्रकल्प, उत्पन्नाचा दाखला कॅम्प व 'कामात आनंद आनंदात काम' सूत्राचा स्वीकार करून यशस्विता मिळविली. प्रशालेत समयदान प्रकल्प, जॉय ऑफ गिव्हिंग, वर्गवार स्वाध्यायमाला कॅलेंडर, अव्यक्त ते अभिव्यक्त, पीएसएम अंतर्गत रोल मॉडेल कृती, स्पेशल चाकरमानी व डिजिटल स्कूल लय भारी यांसारखे उपक्रम राबवले. बीमा स्कूल योजनेतून सर्व विद्यार्थ्यांचा विमा उतरविला. शाळेला बीमा स्कूल पुरस्कारही प्राप्त झाला.

मुलात मूल होऊन काम करणे, विविध अध्यापन पद्धतीचा अवलंब करून अध्ययन-अध्यापन प्रभावी करणे, दहा ते पाच या वेळेत काटेकोर नियोजन करून उत्साहाने काम करणे, प्रसंगी दिवाळी, गणेशोत्सव, शनिवार, रविवार सुट्टी या दिवसात जादा काम करणे, वेगवेगळ्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना क्रियाशील ठेवणे, सातत्याने प्रोत्साहन देऊन काम करणे, वैयक्तिक लक्ष देऊन सर्वांगीण विकास साधणे, इयत्ता पहिलीची माहे फेब्रुवारी पासून तयारी करणे, दहावी-बारावीच्या पॅटर्नच्या पूर्वतयारीवर भर देताना शालेय स्तरावर प्रश्नपत्रिकांचा आराखडा तयार करणे, विद्यार्थी-पालक-समाज यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या निवारणे, शाळा कार्यात शिक्षकांनी अग्रेसर राहणे, स्टाफ मध्ये स्नेहबंध जोपासणे, सातत्याने स्वयंमूल्यमापन करणे, परस्परांचा आदर करणे व नवनवीन मार्ग चोखाळून नावीन्याची कास धरणे, असे केल्यामुळे कोणताही खाजगी क्लास न लावता, पुरेसे संदर्भ साहित्य उपलब्ध नसतानाही सर्वसामान्य वर्गातील विद्यार्थ्यांना, पालकांना, ग्रामस्थांना, समाजाला आपले म्हणून काम केल्याने शाळेचे केवळ पाच वर्षात एन.एम.एम.एस मध्ये २५ विद्यार्थी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत १, माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ३ आणि नवोदय मध्ये २ याप्रमाणे शासकीय परीक्षेत तब्बल ३१ विद्यार्थी झळकले. स्पर्धा परीक्षेचा पाया असणाऱ्या मंथन परीक्षेत ६ विद्यार्थी पात्र झाले. शतक महोत्सवी वर्षात तर इयत्ता आठवीचे सर्वच्या सर्व १५ विद्यार्थी एन.एम.एम.एस परीक्षेला बसले व त्यातील १२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. केवळ स्पर्धा परीक्षेतच नव्हे तर गतिमंद, मतिमंद व अध्ययनअक्षम विद्यार्थ्यांतही नवी ऊर्जा निर्माण करण्याचे काम शाळेने केले. NMMS परीक्षेत ६ वर्षात २८ विद्यार्थी झळकवून शासनाची रू. १३,४४,०००/- इतकी शिष्यवृत्ती प्राप्त केली. २०१४ अखेर विविध स्पर्धा परीक्षांत गुणवत्ताधारक विदयार्थ्यांची फक्त ६ ही संख्या पुढील सहा वर्षात ४४ वर पोहोचली. त्याचाच कित्ता गिरवीत सलग तीन वर्षे तालुक्यातील भडे शाळा व येथील शिक्षक आदर्श ठरले आहेत.


**<u>जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा भडे नं - 1</u>**

**शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**

| अ.क्र. | स्पर्धा परीक्षेचे नाव | वर्ष 2010 | वर्ष 2011 | वर्ष 2012 | वर्ष 2013 | वर्ष 2014 | वर्ष 2015 | वर्ष 2016 | वर्ष 2017 | वर्ष 2018 | वर्ष 2019 | वर्ष 2020 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिष्यवृत्ती (इ. 7 वी) | 0 | 2 | 1 | 0 | 1 | 1 | - | - | - | - | - | 5 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **2** | नवोदय (इ. 9 वी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | **3** |
| **3** | शिष्यवृत्ती (इ. 5 वी) | - | - | - | - | - | - | - | 0 | 1 | 0 | 0 | **1** |
| **4** | शिष्यवृत्ती (इ. 8 वी) | - | - | - | - | - | - | - | 1 | 0 | 1 | 1 | **3** |
| **5** | NMMS (इ. 8 वी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 5 | 4 | 3 | 12 | 3 | **28** |
| **6** | MTS | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **2** |
| **7** | मंथन | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 3 | 0 | 3 | **9** |
| **8** | **एकूण** | **0** | **4** | **1** | **0** | **1** | **2** | **5** | **8** | **7** | **15** | **8** | **51** |

**शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**




**आलेख - शालेय स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक तपशील 2010 ते 2020**

जून २०१९ मध्ये मात्र या शाळेच्या आयुष्यात अचानक टर्निंग पॉईंट आला. जुने सर्व गुणवान शिक्षक बदलले गेले. त्याठिकाणी चार नवीन महिला शिक्षकांची नियुक्ती झाली. नवे शिक्षक, नवी शाळा, खरेतर गीत नवे सूर नवे. प्रभारी मुख्याध्यापिका श्रीम.प्राजक्ता राहटे, पदवीधर शिक्षिका श्रीम.कुलकर्णी, उपशिक्षिका श्रीम.मांडवकर व श्रीम.पवार यांचे ग्रामस्थांनी यथोचित स्वागत केले. त्यांना सर्वतोपरी सहकार्याचा शब्द दिला, मात्र गुणवत्तेशी तडजोड नाही, याचे भानही दिले. नवीन शिक्षकांवर तेथील पालकांचा व ग्रामस्थांचा गुणवत्तेसंदर्भात जबरदस्त दबाव होता. आठवीच्या वर्गाचा अध्यापनाचा कोणताही अनुभव नसताना, केवळ जिद्दीच्या जोरावर चारही महिला शिक्षकांनी जुन्या शिक्षकांच्या पावलावर पाऊल ठेवून काम केले. त्यांना सरपंच श्री सुधीर तेंडुलकर आणि सहकार्यांनी मोलाची साथ दिली. याच वर्षी गावात नेटवर्क आले, त्यामुळे ऑनलाईन बदल्यांबरोबरच शाळाही ऑनलाईन झाली. शाळेची उन्नती साधताना शिक्षिकांनी नैमित्तिक उपक्रमांबरोबरच क्षेत्रभेटी आयोजित केल्या, जादा तासिका घेतल्या. त्याचाच परिपाक म्हणून सन २०२० मध्ये एन.एन.एम.एस. परीक्षेत ०३ विद्यार्थी, माध्यमिक परीक्षेत ०१, नवोदय परीक्षेत ०१ असे एकूण ०५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आणि स्पर्धा परीक्षेची परंपरा अखंडित ठेवण्यात नव्या शिक्षकांनीही यश मिळविले. त्यांनी पालकांचा विश्वास संपादन केला. 'शिक्षकांनी मनावर घेतले तर सारेच चित्र बदलते', याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला.

मुख्याध्यापकांनी आपल्या कुशल नेतृत्वाने दुर्गम,डोंगराळ भागात,आजूबाजूची परिस्थिती प्रतिकूल असताना शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसारख्या क्षेत्रात आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने उल्लेखनीय यश मिळविले. परिस्थितीअभावी पुढील शिक्षणाला फाटा देऊन शाळाबाह्य होण्याचे प्रमाण फक्त थांबविले नाही, तर त्यांना स्वत:मधील प्रतिभा ओळखता यावी, यासाठी अनुकूल वातावरण तयार करून आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले.

- **<u>चिंतनात्मक प्रश्न -</u>**

शाळाबाह्य स्पर्धापरीक्षा व शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणे ही अशक्य बाब आहे. ही भीती पालकांच्या मनामधून दूर होण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी कोणते प्रयत्न केले?

- **<u>चर्चा करूया, विचार करूया -</u>**

आपल्या गावामध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. शहराच्या ठिकाणी एखादी छोटीशी नोकरी पकडून उदरनिर्वाह करण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा वेळेला विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात रहावेत यासाठी शालेय स्तरावरील वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपण त्यांना कशा पद्धतीने आर्थिक स्थैर्य मिळवून द्याल, याविषयी चर्चा करा.

- **<u>शाळा विकास आराखडा</u>**

आपण सध्या कार्यरत असलेल्या शाळेची भौतिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती आपणांस माहीत आहे. आपल्या शाळेची सद्य:स्थिती लक्षात घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या शाळेचा एक वर्षासाठीचा शाळा विकास आराखडा तयार करा.

- **<u>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने प्रज्ञावान मुलांसाठीच्या शिक्षणासंदर्भात केलेला विचार</u>**

कोठारी आयोग १९६४, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ याप्रमाणेच नुकत्याच सादर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रज्ञावंत/ विशेष प्रावीण्यधारक मुलांसंदर्भात पुढील गोष्टींचा उहापोह करण्यात आलेला आहे.

१. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद (NCERT) आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) प्रज्ञावान मुलांच्या शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्वे विकसित करतील .

२. 'प्रज्ञावान मुलांचे शिक्षण' असा एक विशेष अभ्यासक्रम घेण्याची परवानगी शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) मध्ये असावी.

३. शिक्षकाचे उद्दिष्ट हे मुलांना अतिरिक्त पुनर्भरण साहित्य , मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन, वर्गात विद्यार्थ्यांच्या ठरावीक रुची आणि बुद्धिमत्ता यांना प्रोत्साहित करणे हा असेल .

४. घटककेंद्रित आणि प्रकल्प आधारित गट आणि मंडळे यांना शाळा, शाळा समूह, जिल्हा आणि त्याहीपुढे प्रोत्साहित करून साहाय्य केले गेले पाहिजे. उदा. विज्ञान मंडळे, गणित मंडळे, संगीत आणि नृत्य सादरीकरण मंडळे, बुद्धिबळ मंडळे, कविता मंडळे, भाषा मंडळे, नाट्य मंडळे, वादविवाद मंडळे , क्रीडा मंडळे, पर्यावरण मंडळे, आरोग्य आणि सुदृढता मंडळे, योगा मंडळे, इत्यादी.

५. सर्वार्थाने गुणवत्ता आधारीत परंतु समन्यायी प्रवेश पद्धतीने देशातील आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासह देशातील उत्तमोत्तम विद्यार्थी व शिक्षक यांचे लक्ष वेधून, माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या उच्च दर्जाच्या राष्ट्रीय निवासी उन्हाळी कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.

६. शाळा ते स्थानिकस्तर, स्थानिकस्तर ते राज्यस्तर आणि राज्यस्तर ते राष्ट्रीय स्तर अशा सुस्पष्ट समन्वयासह देशभर विविध विषयात ऑलिम्पियाड (Olympiad) आणि तत्सम स्पर्धांचे आयोजन केले जाईल. ज्यामधून सर्व विद्यार्थी त्यांच्या पात्रतेनुसार योग्य त्या स्तरावर सहभागी होत आहेत याची खात्री करता येईल . व्यापक सहभागाची खात्री व्हावी म्हणून ग्रामीण भागात आणि प्रादेशिक भाषेत या परीक्षा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

७. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ओलिम्पियाडमधील निकाल, तसेच संबंधित राष्ट्रीय कार्यक्रमातील निकाल, पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे निकष म्हणून वापरण्यासाठी भारतीय तंत्रशिक्षण संस्था (IIT),राष्ट्रीय तंत्रशिक्षण संस्था (NIT) यांसारख्या अग्रणी संस्थांसह सार्वजनिक तसेच खाजगी विद्यापीठांना प्रोत्साहित करण्यात येईल.

८. एकदा इंटरनेट जोडणीसह स्मार्ट फोन, टॅब्लेट, घरी किंवा शाळेत उपलब्ध झाले की, विविध ऑनलाईन App सेवा जसे की, प्रश्नमंजूषा, मूल्यमापन, गुणवत्ता समृद्धी, इत्यादी साहित्याद्वारे ऑनलाईन सामायिक रुची समूह विकसित होतील आणि पालक व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाखाली वरील उपक्रम गटकार्याद्वारे विकसित करण्यास मदत होईल.
९. ऑनलाईन स्रोत आणि सहयोगातून, डिजिटल अध्यापन वापरून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी शाळा टप्याटप्प्याने स्मार्ट क्लासरूम म्हणून विकसित करतील.

- **<u>मोड्युलची उपयुक्तता</u>**

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये जन्मजात बुद्धिमत्ता असते, त्याचा शोध घेऊन पालनपोषण करून ती विकसित केली गेली पाहिजे. रत्नागिरी जिल्ह्यातील निवडलेल्या या शाळा शहरी व ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करतात. क्षेत्रनिहाय प्रत्येकाच्या समस्या व अडचणी, त्याचबरोबर प्रत्येकाच्या सकारात्मक बाबीसुद्धा वेगवेगळ्या आहेत. या दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक आपल्या शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून त्यांना त्या क्षेत्रामध्ये अंतिम यशापर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असे दिसून येते.दोन्ही मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील प्रज्ञावंत मुले ओळखून त्यांच्या विकासासाठी आवश्यक असे वातावरण आपल्या शाळेत निर्माण केले आहे. प्रामुख्याने शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये दोन्ही शाळांनी उल्लेखनीय असे यश संपादन केले आहे. शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन करण्यासाठी या दोन्ही शाळांची यशोगाथा आपल्याला प्रेरक व मार्गदर्शक ठरते. त्यातील मुख्य बाबी खालीलप्रमाणे-

१. ग्रामीण व शहरी भागामध्ये या परीक्षांमध्ये प्राप्त परिस्थितीतीत यश मिळविण्यासाठी कशा पद्धतीने नियोजन केले पाहिजे या बाबी आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत.
२. ग्रामीण व शहरी भागातील पालक शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांविषयी अनभिज्ञ असतात. अशा वेळेला त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हे मोड्युल आपल्याला मार्गदर्शक ठरते.
३. शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळविणे हे फक्त एका शिक्षकाच्या प्रयत्नांवर अवलंबून नाही, तर संपूर्ण शाळेतील शिक्षकांना एकत्र घेऊन यश संपादन करण्यासाठी एकत्रित प्रयत्न कसे करावेत, तसेच यामध्ये नेतृत्वाची भूमिका कशी महत्त्वाची आहे, याविषयी हे मोड्युल भाष्य करते.
४. शाळेतील प्रज्ञावंत मुले ओळखून त्यांना योग्य दिशा देण्यासंदर्भात हे मोड्युल मार्गदर्शक ठरते.

- **<u>समारोप</u>**

'प्रतिकूल परिस्थितीत सकारात्मक निर्णय घेऊन समूहाला योग्य दिशा देते' तेच खरे नेतृत्व. शहर असो वा ग्रामीण भाग, मुलांचे अंगभूत गुण लक्षात घेऊन, त्या गुणांना वाव देण्यासाठी शालेय नेतृत्वाला वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यातही शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवणे हे तितकेच आव्हानात्मक आहे. समाज, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या एकत्रित समन्वयाने प्रयत्न करावे लागतात. हे क्षेत्रच असे आहे की कुणा एका व्यक्तीच्या जोरावर उद्दिष्ट गाठणे शक्य होत नाही, अशा वेळेला श्री. प्रकाश जाधव सर, श्री. संदीप पावसकर सर व श्रीम.प्राजक्ता राहटे मॅडम यांनी आपापल्या प्रतिकूल पार्श्वभूमीवरती आपल्या सहकार्यांच्या मदतीने साध्य केलेले ध्येय आपल्या सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.

- **<u>संदर्भ सूची</u>**

१. कामत, वसुधा (1990). प्रज्ञावंत बालके हा लेख काळे प्रेमला,(संपादीत) त्यांच्या अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र या पुस्तकातून साभार. पुणे, मॅजेस्टिक प्रकाशन.
२. करंदीकर सुरेश, (2009). अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र. कोल्हापूर, फडके प्रकाशन.
३. शिक्षणाचे अधिष्ठान - मानसशास्त्रीय (१९९२), नाशिक, य.च.म. मु. विद्यापीठ.
४. मानवी स्मृती, विचारप्रक्रिया आणि व्यक्ती भेद (२००१), नाशिक,य.च.म. मु. विद्यापीठ.
५. मनोमापन व सांख्यिकी (२००२), नाशिक,य.च.म. मु. विद्यापीठ.

६. Gardner, Howard. (1983) "Frames of Mind: The Theory of Multiple Intelligences." New York : Basic Books Retrieved, March, 03, 2021, from http://en.wikipedia.org/

७. content/undp/en/home/sustainable-development-goals/goal-4-qualityeducation.htmlRetrieved,Feb,13, 2021, from https://www.undp.org/

८. List_of_gifted_and_talented_programmes Retrieved,Feb,12,2021,from https://www.undp.org/

९. Krishna Prasad, S.U. (2010) Effectiveness of enrichment programme for scientifically talented students at secondary level. Unpublished doctoral dissertation, University of Mysore Retrieved,Feb,13, 2021, from http://shodhganga.inflibnet.ac.in:8080/jspui/handle/10603/36422

१०. Neeraja.(2012), An investigation of study habits as a function Of self perceptions of gifted and creative students belonging to arts and science academic streams. Unpublished doctoral dissertation, Chaudhary Charan Singh University Retrieved, Feb,13,2021, from https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/21957

११. Bhandari, Anjali,(2015), Locus of control of the gifted secondary school students in relations to their self concept hardiness and emotional intelligence. Punjabi University Retrieved,Feb,13, 2021, from https://shodhganga.inflibnet.ac.in/jspui/handle/10603/248879

१२. national-standards-gifted-and-talented-education/pre-k-grade-12 Retrieved,Feb,13,2021,From http://www.nagc.org/resources-publications/resources/

- **महत्वाचे शासन निर्णय**

१. शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक डोविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३ मंत्रालय मुंबई दि १८ जानेवारी २०१०

२. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका -२००९ /प्र.क्र.६ /का.१४८३ मंत्रालय मुंबई दि.३१ जुलै २०१२

३. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका-२०१५/प्र.क्र.४२/का.१४८१-अ मंत्रालय मुंबई दि १५ जून २०१८

४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एससीएच -२००९/(९०/०९)केंपुयो, मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि - २२ जुलै २०१०

५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एफईडी -४०१४ /६४३/प्र.क्र.४/एसडी मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दि - २९ जून २०१५

६. शासन परिपत्रक , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - NMMSS-२०१८/प्र.क्र.६६/एसडी मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दि - २० जून २०१८

- **Website**

१) https://www.mscepune.in/
२) https://www.rimc.gov.in
३) https://nmms.mscescholarshipexam.in//
४) https://nts.mscescholarshipexam.in//
५) https://navodaya.gov.in/
६) https://www.sainiksatara.org/
७) https://aissee.nta.nic.in/

**मोड्यूल विकसक**
श्री. रमेश बापू कोरे
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रत्नागिरी

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**मार्गदर्शक**
डॉ.नेहा बेलसरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद